सामना मुंबई, गुरुवार, दि. ३ फेब्रुवारी २०११ 

## मुंबई प्लस

# किल्ले प्रतापगडाच्या जीर्णोद्धारासाठी १ कोटी ३१ लाख

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - किल्ले प्रतापगडाच्या जीर्णोद्धाराचे काम अतिशय समाधानकारक असल्याने तातडीने १ कोटी ३१ लाख रुपये उपलब्ध करून दिले जातील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे सांगितले.

येथील सह्याद्री अतिथिगृहात किल्ले प्रतापगडाच्या जीर्णोद्धारासंदर्भात झालेल्या बैठकीत पवार बोलत होते. राज्यमंत्री सचिन अहिर आदींसह स्थानिक आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रतापगड जीर्णोद्धार समिती, पर्यटन विकास निधी आणि लोकसहभागातून गेल्या तीन वर्षापासून किल्ले प्रतापगडाच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे.

कामाचा आवाका प्रचंड असल्याने प्रतापगड जीर्णोद्धार समितीने प्रतापगड विकासाच्या पहिल्या भागाचा आराखडा चार टप्प्यात तयार करून सादर केला आहे. या आराखड्यानुसार चार वर्षांत १२ कोटी ९८ लाख रुपयांचा निधी अपेक्षित आहे. ही रक्कम तातडीने उपलब्ध करून दिली जाईल. प्रसंगी सीएफ फंडमधूनही निधी दिला जाईल. हा निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत खर्च केला जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. कामाच्या पूर्ततेप्रमाणे जिल्हाधिकारी तो वितरित करतील आणि कामावरही लक्ष ठेवतील. नंतरच्या टप्प्यांसाठी दरवर्षी डीपीटीसीमधून निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देशही पवार यांनी दिले.

